रयत शिक्षण संस्थेचे

# डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

## पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

## युवास्पंदन – भित्तिपत्रक

# मराठी भाषा गौरव दिन विशेषांक

## २७ फेब्रुवारी २०२४

संपादक मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : प्र. प्राचार्य, डॉ. बाळासाहेब चव्हाण |
| चेअरमन | : डॉ. देवानंद सोनटक्के |
| सदस्य | : प्रा. मयुरी जाधव |
| | : प्रा. अश्विनी मांढरे |
| विद्यार्थी | १. पूजा शिंदे, बी. ए .३ |
| | २. शिवानी कदम , बी. ए. १ |
| | ३. श्वेता बर्गे, एम. ए. १ |
| | ४ . नेहा जाधव, एम. ए. १ |
| | ५ . प्रियांका कांबळे, बी. ए. १ |
| | ६ . नंदिनी राउत, बी. ए. २ |
| | ७. अंकिता येवले , बी. ए. १ |


कुसुमाग्रजांचा जीवन परिचय -

कुसुमाग्रजांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे बदलले गेले.[१] कुसुमाग्रजांचे वडील वकील होते, वकिलाच्या व्यवसायासाठी ते पिंपळगाव बसवंत या तालुक्याच्या गावी आले, कुसुमाग्रजांचे बालपण येथेच गेले.[२] कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती, एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणून कुसुमचे अग्रज म्हणून 'कुसुमाग्रज' असे नाव त्यांनी धारण केले. तेव्हापासून शिरवाडकर कवी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. नाशिक येथील हं. प्रा. ठा. कला महाविद्यालयातून त्यांनी आपले बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी, अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले. १९३० मध्ये झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कुसुमाग्रज यांचाही सहभाग होता. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरुवात याच लढ्यापासून झाली आहे.[३][४] १९३३ साली त्यांनी 'ध्रुव मंडळा'ची स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमधे सहभाग घेतला. पुढील काळातही त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली.

पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ. अ.ना. भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ संपून ती मृतप्राय होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी कवी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले, केवळ कवी असलेले वि.वा. शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले.

१० मार्च १९९९ रोजी शिरवाडकरांचे निधन झाले.

**अंकिता येवले , बी. ए. भाग १**




### कुसुमाग्रजांचे साहित्य लेखन –

मराठी राजभाषा दिन 27 फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. मराठी राजभाषा दिन महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्त मराठी भाषा दिन साजरा केला जातो. मराठी राजभाषा दिनाला मराठी गौरव दिन असेही म्हटलं जातं. आपल्या पुढील पिढीने मराठी भाषेचे संवर्धन करावे म्हणून मराठी भाषा दिन साजरा केला जातो.कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेला सन्मान मिळवून देण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. कुसुमाग्रज महाराष्ट्राचे लाडके साहित्यकार, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, थोर लेखक, नाटककार म्हणून ओळखले जातात. कुसुमाग्रजांनी अनेक सरस कथा, कांदबऱ्या, निबंध,

लघुकथा, नाटक, कविता इ. यांचे कुशल लेखन केले. विशाखा हा कवितासंग्रह आणि नटसम्राट हे नाटक त्यांच्या दोन गाजलेल्या साहित्यकृती आहेत.

कुसुमाग्रजांच्या कारकीर्दीत पाच दशके विस्तारली आणि या काळात त्यांनी कविता, लघुकथा, निबंध, नाटकं आणि कादंबऱ्या या रुपात सुंदर साहित्य तयार केलं. 1942 मध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारी कवितासंग्रह, विशाखा ही त्यांच्या सर्वात प्रसिद्ध लेखणीपैकी एक आहे. मराठी भाषा दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे स्थापना केली.


मराठी ही सर्वांगसुंदर भाषा असून भारतातील अधिकृत 22 भाषांपैकी एक भाषा आहे. मराठी भाषा जगातील लोकसंख्येत सर्वाधिक बोलली जाणारी 15 वी भाषा आहे तर भारतात सर्वात जास्त बोलली जाणारी तिसरी भाषा आहे. महाराष्ट्र तसेच गोवा या 2 राज्यांची मराठी ही अधिकृत राज भाषा आहे. मराठी भाषेची साहित्यसंपदा विपुल असून या भाषेला थोर परंपरा लाभली आहे.


मराठी भाषेचा उगम नवव्या शतकापासून झालेला समजतो.पैठण येथील सातवाहन साम्राज्याने प्रशासनात महाराष्ट्री भाषेचा सर्वप्रथम वापर केला. नंतर देवगिरीच्या यादव काळात मराठी भाषेची समृद्धी झाली. इसवीसन बाराशे अष्टोत्तर मध्ये म्हाईमभट यांनी लिळा चरित्र लिहिले आणि संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. ते म्हणतात माझी मराठीची बोलू कौतुके, परी अमृताहे पैजा जिंके. अर्थात आपली मायबोली अमृतालाही पैंजेत जिंकेल. संत एकनाथ महाराजांनी मराठी भाषेतून भारुडे लिहिली. मराठी भाषा अनेक संताच्या कीर्तनांनी, ओव्यांनी तशीच भजनांनी सजली आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेतून लिहिला.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचे व संस्कृतीचे संरक्षण केले.महाराजांनी मराठी भाषेसाठी पहिला राजकोश तयार केला.

मराठी भाषा ही महाराष्ट्राची अधिकृत भाषा असली तरी गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, छत्तीसगड तसेच दमण-दीव या केंद्रशासित प्रदेशातील काही भागात सुद्धा मराठी भाषा बोलली जाते.


**प्रियांका कांबळे, बी. ए. भाग १**


लाभले आम्हास भाग्य
बोलतो मराठी...
Hindimarathisms.com
२७ फेब्रुवारी
ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित
कविश्रेष्ठ कुसुमाग्रज
यांचा आज जन्मदिवस !
मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा!



मराठी भाषा दिन
ज्ञानदेवांनी रुजवली
ती भाषा मराठी....
शिवरायांनी टिकवली
ती संस्कृती मराठी...
संतानी वाढवला
तो वाण मराठी....
आमची मायबोली आमचा अभिमान मराठी !!


मराठी म्हणजे गोडवा, मराठी म्हणजे प्रेम,
मराठी म्हणजे संस्कार,
मराठी म्हणजे आपुलकी,
आणि मराठी म्हणजे महाराष्ट्र
मराठीला माय मानणाऱ्या
सर्व मराठी बांधवाना...
जागतिक मराठी भाषा दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
लाभले आम्हास भाग्य
बोलतो मराठी...
Smit Creation .com


मराठी म्हणजे
गोडवा,
मराठी म्हणजे
प्रेम
मराठी भाषा
म्हणजे संस्कार,
मराठी म्हणजे
आपुलकी.
SmitCreation.com
मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा


LATESTLY
माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा
-कुसुमाग्रज

पूजा शिंदे, बी. ए . भाग ३


27 फेब्रुआरी
मराठी
राजभाषा दिवस
ज्ञानपीठ पुरस्कार विजेते,
'पद्म भूषण'
मराठी साहित्याचा
मानदंड अर्थात
विष्णु वामन शिरवाडकर
उर्फ कवी कुसुमाग्रज
यांचा जन्मदिवस
SmitCreation.com
कुसुमाग्रजांना त्रिवार अभिवादन व
जागतिक मराठी दिनाच्या सर्वांना खुप शुभेच्छा

# हिमलाट

हिमलाट पहांटे पहा जगावर आली !
मुखिं पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस

पाडीत मळे मोत्यांचे चरणीं ओस
उद्दाम धावते करित दुभङ्ग धरेस
करकरां पांखरें रगडी दाताखालीं
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

श्रीमन्त महालीं तिथें हिला न थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

पाहून परन्तू कुठें कुडाचीं खोपीं
कंगाल कांबळीं टाकुन गेले झोंपी
शेंकडों कवाडे ! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथें लांब भुकेली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

ज्योतींतुनि धावत या तेजःकण सारे
या यज्ञांतिल अनूसरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवुं द्या वणवा कणाकणांत मशाली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

## दूर मनोऱ्यात

वादळला हा जीवनसागर – अवसेची रात
पाण्यावर खळबळा लोळतो रुसलेला वात
भांबावुनी आभ्रांच्या गर्दित गुदमरल्या तारा
सुडाने तडतडा फाडतो उभे शीड वारा

पिंजुनिया आयाळ गर्जती लाटा भवताली
प्रचंड भिंगापरी फुटते जळ आदळुनी खाली
प्रवासास गल्बते आपुली अशा काळरात्री
वावटळीतिल पिसांप्रमाणे हेलावत जाती
परन्तु अन्धारात चकाके बघा बंदरात

स्तम्भावरचा प्रकाश हिरवा तेजस्वी शांत
किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी
काळोखावर खोदित बसला तेजाची लेणी
उज्ज्वल त्याची पहा प्रभावळ दूर मनोऱ्यात
अन् लावा हृदयात सख्यांनो आशेची वात

## नदी

नदीबाई माय माझी डोंगरात घर
लेकरांच्या मायेपोटी येते भूमीवर
नदीबाई आई माझी निळे निळे पाणी
मंद लहरीत गाते ममतेची गाणी

नदीमाय जळ सा-या तान्हेल्यांना देई
कोणी असो कसा असो भेदभाव नाही

शेतमळे मायेमुळे येती बहरास
थाळीमध्ये माझ्या भाजी-भाकरीचा घास

श्रावणात आषाढात येतो तिला पूर
पुढच्यांच्या भल्यासाठी जाई दूर दूर

माय सांगे, थांबू नका पुढे पुढे चला
थांबत्याला पराजय चालत्याला जय

नंदिनी राउत, बी. ए. भाग २

## निरोप

गर्दीत बाणासम ती घुसोनि
चाले, ऊरेना लव देहभान
दोन्ही करांनी कवटाळूनीया
वक्ष:स्थळी बालक ते लहान
लज्जा न, संकोच नसे, न भीती
हो दहन ते स्त्रीपण संगरात
आता ऊरे जीवनसूत्र एक
गुंतोनी राहे मन मात्र त्यात
बाजार येथे जमला बळींचा
तेथेही जागा धनिकांस आधी
आधार अश्रूसही दौलतीचा
दारिद्र्य दु:खा दुसरी उपाधी
चिंध्या शरीरावरी सावरोनी
राहे जमावात जरा उभी ती
कोणी पहावे अथवा पुसावे?
एकाच शापातून सर्व जाती
निर्धार केला कसला मानसी
झेपाउनी ये ठिणगीप्रमाणे
फेकूनिया बाळ दिले विमाने
व्हावे पुढे काय प्रभूच जाणे
"जा बाळा जा, वणव्यातुनी या
पृथ्वीच आई पुढती तुझी रे
आकाश घेईं तुजला कवेंत
दाही दिशांचा तुज आसरा रे"
ठावे न कोठे मग काय झाले
गेले जळोनीं मन मानवाचे
मांगल्य सारे पडले धुळीत
चोहीकडे नर्तन हिंस्त्रतेचे!

ओळखलंत का सर मला, पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून
माहेरवाशीण पोरीसारखी, चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली
भिंत खचली चूल विझली, होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे, सर आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे
खिशाकडे हात जाताच, हसत हसत उठला
पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार, तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून

# फक्त लढ म्हणा

\- कुसुमाग्रज

शिवानी कदम , बी. ए. १

## स्वातंत्र्यदेवीची विनवणी | कुसुमाग्रज कविता

पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करू नका
मीच विनविते हात जोडूनी वाट वाकडी धरू नका
सूर्यकुलाचा दिव्य वारसा प्रिय पुत्रांनो तुम्हा मिळे
काळोखाचे करून पूजन घुबडांचे व्रत करू नका

अज्ञानाच्या गळ्यात माळा अभिमानाच्या घालू नका
अंध प्रथांच्या कुजट कोठारी दिवाभीतासम दडू नका

जुनाट पाने गळून पालवी नवी फुटे हे ध्यानी धरा
एकविसावे शतक समोरी सोळाव्यास्तव रडू नका

वेतन खाऊन काम टाळणे हा देशाचा द्रोह असे
करतील दुसरे, बघतील तिसरे असे सांगुनी सुटू नका

जनसेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा
मेजाखालून, मेजावरतून द्रव्य कुणाचे लुटू नका

बोथट पुतळे पथापथावर ही थोरांची विटंबना
कणभर त्यांचा मार्ग अनुसरा, वांझ गोडवे गाऊ नका

सत्ता तारक सुधा असे पण सुराही मादक सहज बने
करीन मंदिरी मी मदिरालय अशी प्रतिज्ञा घेऊ नका

प्रकाश पेरा अपुल्या भवती दिवा दिव्याने पेटतसे
इथे भ्रष्टता, तिथे नष्टता, शंखच पोकळ फुंकू नका

पाप कृपणता, पुण्य सदयता, संतवाक्य हे सदा स्मरा
भलेपणाचे कार्य उगवता कुठे तयावर भुंकू नका

श्वेता बर्गे, एम. ए. भाग १

## मौन

शिणलेल्या झाडापाशी
कोकिळा आली ,
म्हणाली गाणं गाऊ का ?

झाड बोललं नाही
कोकिळा उडून गेली

शिणलेल्या झाडापाशी
सुगरण आली

झाड बोललं नाही
सुगरण निघून गेली

चंद्रकोर आली
म्हणाली जाळीत लापु का ?
झाड काही बोललं नाही
चंद्रकोर मार्गस्थ झाली

शिणलेल्या झाडापाशी
बिजली आली
म्हणाली मिठीत येऊ का ?
झाडाचं मौन सुटलं
अंगाअंगातुन
होकारच तुफान उठलं

नेहा जाधव, एम. ए. भाग १